# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, मुंबई

**धारिका क्रमांक : BM १०(१)(३)/३०७/पंधरा** **जाहिरात क्रमांक : ५३/२०१६**

आयोगामार्फत **बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, मुंबई या पदाच्या सात जागांसाठी ऑनलाईन** पध्दतीने **अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पुर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

२ . **उपलब्ध पदसंख्या :- २ + ५▼ = ७**

| जात प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एकूण मागासवर्गीय | अमागास | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | -- | -- | १▼ | -- | -- | -- | १▼ | २▼+१▼ * | ५▼ | २ | ५▼+२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | -- | १▼ | -- | -- | -- | १▼ | २▼ | ४▼ | १ | ४▼+1 |
| **अ)महिला (३०%)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १▼ * | १▼ * | १ * | १▼*+१* |
| **ब)खेळाडू(५%)** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

@ विकलांग - १ पद अंधत्व/ क्षीणदृष्टी विकलांग प्रवर्गाकरिता आरक्षित असून या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद श्रवण शक्तीतील दोष किंवा चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू प्रवर्ग अशा क्रमवारीनूसार भरण्यात येईल.

**@ विकलांग प्रवर्गासाठी आरक्षित असलेले १ पद भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहे.**

* उपलब्ध असल्यास महिलासाठी आरक्षित.

(▼ अनुशेषाची पदे)

**२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये महानगरपालिकेच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.**

**२.२** नगर विकास विभाग, शा. नि.क्र. संकीर्ण २००४/६३९/प्र.क्र. ९६/०४ नवि - २० दिनांक १३ ऑगस्ट २००४ नुसार तसेच शा. नि. क्र. न्यायाप्र/२००९ प्र.क्र. ९/सुधार – ३ दिनांक १३ ऑगस्ट २००९ च्या अनुषंगाने (अ)अंधत्व/ क्षीणदृष्टी (Blindness or Low vision) (ब) श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment) (क) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or cerebral palsy) प्रवर्गाचे विकलांग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.

**२.३** शासन आदेशानुसार वि.जा.(अ) वर्गवारीसाठी राखीव असलेले पद आंतर परिवर्तनीय असून सदर वर्गवारीतील पात्र उमेदवार न आढळल्यास सदर पदासाठी भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज. (ड) या पैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३. वेतनश्रेणी : पे बॅण्ड रु. १५६००-३९१००/-, ग्रेड पे रु. ६६००/- अधिक इतर भत्ते -**

**४. पात्रता-**

**४.१ वय - दिनांक १ मार्च, २०१७ रोजी अमागासकरिता ४० वर्षे व मागासवर्गीयासाठी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**४.२ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.**

**४.३** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/किंवा अनुभव धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. **परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरीष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.**

**४.४ शैक्षणिक अर्हता – Candidate must possess a degree in Arts, Science, Law, Commerce, Medicine, or Engineering of recognised university or an equivalent qualification and thereafter**

४.५ अनुभव – **Have administrative, executive or supervisory experience in a responsible capacity for not less than five years in Government, Semi - Government or any big industrial or commercial concern.**

४.५.१ **The experience of ex-armed force officers will be considered as supervisory experience for the duration they served in armed forces as commissioned officers.**

४.५.२ **Candidate should give details & submit evidence regarding administrative experience, supervisory experience or executive experience on responsible post.**

४.६ उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत **१००** गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.

**किंवा**

महाराष्ट्र शासनाच्या एतदर्थ मंडळामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.
टीप : (१) 'जबाबदारीच्या पदावर' म्हणजे शासनामधील किंवा सरकारी क्षेत्रातील संस्था किंवा परिसंस्था यामधील वेतनबँड पी.बी. – २ रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु. ४४०० किंवा त्यापेक्षा जास्त वेतनबँड व ग्रेड पे मधील राजपत्रित पद असा घेण्यात यावा. तसेच यामध्ये सदर वेतनबँड व ग्रेड पे मधील पदाशी समकक्षता सुनिश्चित करता येईल, अशा अन्य क्षेत्रातील पद देखील विचारात घेता येईल.
(२) खाजगी संस्थेतील 'जबाबदारीचे पद' म्हणजे उच्च श्रेणीतील वरिष्ठ व्यवस्थापकीय पदांचा अनुभव हा जबाबदारीच्या पदावरील अनुभव म्हणून सदर पदासाठी ग्राहय धरण्यात येईल.
**(३)** "मोठया औद्योगिक संस्था" म्हणजे अशी शासकीय/खाजगी संस्था जेथे **१०००** पेक्षा अधिक सेवकवर्ग कार्यरत आहेत.

**४.७ परिविक्षाधीन कालावधी ३ वर्षे राहील.**

**५.** प्रस्तूत पदासाठी वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा दोन टप्यामध्ये सदर भरती प्रक्रिया घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेची तारीख यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे जाहिरातीतील विहित मूळ अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. सदर परीक्षेचा अभ्यासक्रम परीक्षा योजना, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेब साईटवर पहाव्या.

**५.१** संबंधित वस्तुनिष्ठ परीक्षा ही २०० गुणांची १ तास कालावधीची राहील व त्यासाठी ३:१ गुणोत्तरात निगेटिव्ह गुणदान असेल. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारास किमान ३५% व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारास ३०% गुण मिळवणे आवश्यक राहील. तसेच विकलांगांकरिता २०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. मुलाखतीसाठी ५० गुण राहतील व निवड होण्यासाठी त्यापैकी त्यातील किमान २१ गुण मिळवणे आवश्यक राहील. अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारित असेल.

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७.** जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**८.** कर्तव्ये व जबाबदाऱ्या - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

९ . शुल्क :

**९.१** अमागास उमेदवारांकरिता - रु. **५२३/-** २) मागासवर्गीय उमेदवारांकरीता रु. **३२३/-**

**९.२** ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व पात्रतेच्या निकषांमध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे, अशा उमेदवारांची अमागास सर्वसाधारण वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

**१०.** अर्ज करण्याची पध्दत –

**१०.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२** पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ ते दिनांक १५ डिसेंबर, २०१६** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१०.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**१०.६** www.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**१०.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२)"माझे खाते या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**११.** लेखी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने लेखी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन प्रिंट करुन घेणे व लेखी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१२.** लेखी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय लेखी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१४. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मुळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१५.विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१६. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १६ डिसेंबर, २०१६ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- २५ नोव्हेंबर, २०१६**

**राजन बा. खोत**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**